आशिया चषकासाठी आज संघनिवड; श्रेयसबाबतच्या निर्णयाकडेही लक्ष

गिलबाबत संभ्रम कायम

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

आगामी आशिया चषक ट्वेन्टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय संघाची आज, मंगळवारी निवड केली जाणार असून कसोटी कर्णधार शुभमन गिल आणि अनुभवी फलंदाज श्रेयस अय्यर यांच्याबाबत कान निर्णय घेतला जातो, याकडे सर्वांचे लक्ष असेल. केवळ १५ स्थानांसाठी जवळपास ३० खेळाडूंचे पर्याय उपलब्ध असल्याने संघनिवड करताना अजित आगरकर यांच्या समितीचीच कसोटी लागणार आहे.

पुढील वर्षी भारत आणि श्रीलंकेत ट्वेन्टी-२० विश्वचषक होणार असून संघबांधणीच्या दृष्टीने आशिया चषक स्पर्धा निर्णायक ठरू शकेल. आशिया चषक स्पर्धा ९ ते २८ सप्टेंबर या कालावधीत संयुक्त अरब अमिराती येथे रंगणार आहे.

भारतीय संघाने गतवर्षी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धा जिंकल्यानंतर रोहित शर्मा, विराट कोहली आणि रवींद्र जडेजा या तारांकितांनी क्रिकेटच्या लघुतम प्रारूपातून निवृत्ती घेतली. त्यानंतर नेतृत्वाची धुरा सूर्यकुमार यादवकडे सोपविण्यात आली आणि अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, संजू सॅमसन यांसारख्या नव्या दमाच्या खेळाडूंना संधी देण्यात आली. या खेळाडूंनी संधीचे सोने केल्याने भारताने इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश यांसारख्या संघांविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत यश मिळवले. त्यामुळे आता आशिया चषकासाठीही याच खेळाडूंवर विश्वास दाखवायचा की 'आयपीएल', तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कसोटी, एकदिवसीय क्रिकेटमध्ये यशस्वी ठरत असलेल्या शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि यशस्वी जैस्वाल यांसारख्या खेळाडूंना संघात समाविष्ट करावे, हा अवघड निर्णय निवड समितीला घ्यावा लागणार आहे.

श्रेयस जवळपास दोन वर्षांपासून ट्वेन्टी-२० संघातून बाहेर आहे, तर गिलने अखेरचा आंतरराष्ट्रीय ट्वेन्टी-२० सामना गेल्या वर्षी जुलैमध्ये खेळला होता. मात्र, या वर्षीच्या 'आयपीएल'मध्ये या दोघांनीही धावांचा रतीब उभारला. सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांमध्ये गिल (१५ सामन्यांत ६५०) आणि श्रेयस (१७ सामन्यांत ६०४) अनुक्रमे चौथ्या आणि सहाव्या स्थानावर होते. तसेच काही महिन्यांपूर्वी अमिराती येथेच झालेल्या चॅम्पियन्स करंडक एकदिवसीय स्पर्धेत श्रेयसने चमकदार कामगिरी केली होती. दुसरीकडे, गिलने नुकत्याच झालेल्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत अनेक विक्रम रचले. त्यामुळे आता ट्वेन्टी-२० संघासाठीही या दोघांचा विचार करणे निवड समितीला भाग पडले आहे.

अमिराती येथील संथ खेळपट्ट्यांचा विचार करता निवड समिती फिरकीपटूंना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांचे स्थान निश्चित मानले जात असून कुलदीप यादव, रवी बिश्नोई आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्यापैकी दोघांना संधी दिली जाऊ शकेल. तारांकित वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराने आपली उपलब्धता कळवल्याने त्याची निवडही अपेक्षित आहे. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मोहम्मद सिराजला संधी मिळते का, हे पाहणेही महत्त्वाचे ठरेल.

श्रेयसचे पारडे जड सूत्रांच्या म्हणण्यानुसार, गिलच्या तुलनेत श्रेयसच्या पुनरागमनाची शक्यता अधिक आहे. आशिया चषकासाठी गिलला संघात स्थान दिले, तर त्याला अंतिम ११ मध्ये ध्यावेच लागेल, अशी संघ व्यवस्थापन आणि निवड समितीची धारणा आहे. त्यातच आशिया चषक स्पर्धा २८ सप्टेंबरला संपणार असून भारतीय संघ मायदेशात २ ऑक्टोबरपासून वेस्ट इंडिजविरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. त्यामुळे आशिया चषकात खेळल्यास गिलला विश्रांती करण्यासाठी पुरेसा वेळ मिळू शकणार नाही. श्रेयस सध्या कसोटी संघाचा भाग नसल्याने त्याला ट्वेन्टी-२० संघात प्राधान्य मिळू शकेल.

कोणत्या जागेसाठी कोण दावेदार?

- **फलंदाज** : सूर्यकुमार यादव, अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, श्रेयस अय्यर, रिंकू सिंह, शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, साई सुदर्शन, ऋतुराज गायकवाड
- **यष्टिरक्षक** : संजू सॅमसन, जितेश शर्मा, केएल राहुल, इशान किशन
- **अष्टपैलू** : हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, शिवम दुबे, वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, रियान पराग
- **गोलंदाज** : जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, मोहम्मद सिराज, प्रसिध कृष्णा, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, रवी बिश्नोई

ओस्तवाल, वाळुंजींची फिरकी प्रभावी

चेन्नई : विकी ओस्तवाल (३/५७) आणि हितेश वाळुंज (३/६८) या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांच्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर महाराष्ट्राने बुची बाबू करंडक क्रिकेट स्पर्धेतील सलामीच्या लढतीत छत्तीसगडचा डाव २५२ धावांत संपुष्टात आणला.

छत्तीसगडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर अवघ्या २२ धावांतच आपले सलामीवीर गमावले. यानंतर अविनाश सिंह ढालिवाल (५२) आणि संजीत देसाई (९३) यांनी छत्तीसगडचा डाव सावरला. या दोघांनी ८४ धावांची भागीदारी रचली. ओस्तवालने ढालिवालला बाद करत ही भागीदारी मोडीत काढली. यानंतर ओस्तवाल आणि वाळुंजच्या फिरकीसमोर छत्तीसगडने ठरावीक अंतराने गडी गमवाले. शुभम अगरवालने (४१) दिलेल्या योगदानामुळे छत्तीसगडला अडीचशे धावांचा टप्पा ओलांडता आला.

नामांकितांच्या सहभागाचे आकर्षण

अमेरिकन टेनिस स्पर्धेच्या मिश्र दुहेरी लढती आजपासून

वृत्तसंस्था, न्यूयॉर्क

वर्षातील अखेरची ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धा आशी ख्याती असलेल्या अमेरिकन खुल्या स्पर्धेने या वर्षीपासून नवा पायंडा पाडला असून, एकेरीच्या स्पर्धेच्या जवळपास आठवडाभराआधीच मिश्र दुहेरीच्या लढतींना सुरुवात होणार आहे. मिश्र दुहेरीच्या दोनदिवसीय स्पर्धेला आज, मंगळवारपासून सुरुवात होणार असून यात नामांकित खेळाडूंच्या सहभागाचे आकर्षण असेल.

या स्पर्धेत आठ जोड्यांना थेट प्रवेश देण्यात आला आहे. यात पुरुष एकेरीतील अग्रमानांकित यानिक सिन्नेर आणि कॅटरिना सिनियाकोवा यांच्याही सामावेश आहे. कार्लोस अल्काराझ एम रँडुकानुसह खेळणार असून, पहिल्या फेरीत त्यांची गाठ अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि जॅक ड्रॅपर या जोडीशी पडणार आहे. त्याच वेळी सिन्नेर-सिनियाकोवा पहिल्या फेरीत ॲलेक्झांडर इवेरेव आणि बेलिंडा बेंचिच जोडीविरुद्ध खेळणार आहे. नोव्हाक जोकोविच आणि ओल्गा डॅनिलोविच जोडीसमोर डॅनिल मेदवेदेव आणि मीरा आंद्रिवाचे आव्हान असेल.

एकेरीतील बहुतेक आघाडीचे खेळाडू या वेळी मिश्र दुहेरीत खेळणार आहेत. अमेरिकन स्पर्धेतील दोन वेळची विजेती नाओमी ओसाकाला सेल्फ मॉफिस, कॅरोलिना मुचोवाला आंद्रि रुब्लेव आणि लॉरेन्झो मुसेट्टीला केटी मॅकनॅलीची साथ लाभेल. मुसेट्टी जॅस्मिना पाओलिनीच्या साथीत खेळणार होता. मात्र, ती सिनिसनाटी स्पर्धेत अंतिम फेरीपर्यंत पोहोचल्याने तिने अमेरिकन स्पर्धेच्या मिश्र दुहेरीतून माघार घेतली. मात्र, सिनिसिनाटी स्पर्धेच्या अंतिम फेरीतील तिची प्रतिस्पर्धी इगा श्वीआंटेक कॅम्पर रुडच्या साथीत खेळणार आहे. मिश्र दुहेरीतल गतविजेता सारा एरानी आणि आंद्रिया वावासोरी जोडीही स्पर्धेत सहभाग नोंदवेल.

वेळापत्रकात बदल का?

अमेरिकन खुल्या स्पर्धेत मिश्र दुहेरीची स्वतंत्र स्पर्धा खेळविण्याच्या निर्णयाने अनेकांनी भुवया उंचावल्या होत्या. आयोजकांच्या या निर्णयावर खेळाडूंमधून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. एकेरीतील अव्वल खेळाडूंना मिश्र दुहेरीच्या लढती खेळण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे आयोजकांनी सांगितले. मात्र, गतविजेत्या सारा एरानी आणि आंद्रिया वावासोरी जोडीने या निर्णयावर टीका केली आहे.

रायगड बॅडमिंटन संघाला कांस्यपदक

नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या आंतरजिल्हा महिला बॅडमिंटन स्पर्धेत रायगडच्या संघाने कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत एकूण २३ संघ सहभागी घेतले होते. रायगडच्या संघात गाथा सूर्यवंशी, प्रकृती शर्मा, अनुष्का इप्टे, रक्षा कंदरवाणी आणि श्रावणी पडवळ यांचा समावेश होता. त्यांना मनदीप आणि शिवा यांचे मार्गदर्शन लाभले.

आशिया चषक हॉकीत पाकिस्तानऐवजी बांगलादेश?

नवी दिल्ली : पाकिस्तानने अद्याप आशिया चषक हॉकी स्पर्धेतील आपला सहभाग निश्चित केलेला नाही. त्यांच्या माघारीचे वृत्त अजूनही बाहेरुनच आम्हाचापर्यंत आले आहे. आम्ही अधिकृत माहितीच्या प्रतीक्षेत आहोत, ही आठवड्यापूर्वीची 'हॉकी इंडिया'ची भूमिका काय आहे. मात्र, पडद्यामागे पाकिस्तानच्या जागी बांगलादेशला समाविष्ट करुन घेण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे समजते.

''भारताने स्पर्धेसाठी पाकिस्तानी खेळाडूंना विसा देण्यास मान्यता दिली आहे. यानंतरही सुरक्षेच्या कारणावरुन पाकिस्तानने स्पर्धेतून माघार घेतल्याचे आमच्या कानावर येत आहे. आम्ही बांगलादेश हॉकी संघटनेची संपर्क साधला आहे,'' असे 'हॉकी इंडिया'कडून सांगण्यात आले

'जीएसटी' घोषणेमुळे बाजाराला उधाण

सेन्सेक्स-निफ्टीची सात आठवड्यांतील सर्वाधिक वाढ

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : वस्तू आणि सेवा कर अर्थात जीएसटी व्यवस्थेत मोठ्या सुधारणांच्या सरकारच्या प्रस्तावामुळे, या पावलांचे संभाव्य लाभार्थी टरणाऱ्या वाहने आणि ग्राहकोपयोगी वस्तू क्षेत्राशी संबंधित शेअर्समध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या खरेदीने सोमवारी बाजाराने मोठी झेप घेतली. प्रत्येकी जवळपास १ टक्क्यांनी वाढ झालेल्या सेन्सेक्स-निफ्टी निर्देशांकांनी मागील सात आठवड्यांतील सर्वोत्तम वाढ वातून साधली.

मुंबई शेअर बाजाराचा 'सेन्सेक्स' ६७६.०९ अंशांनी वधारून दिवसअखेरीस ८१,२७३.७५ वर स्थिरावला. सुरुवात हजारहून अधिक अंशांची झेप घेत कोलेलया या निर्देशांकाने दिवसभरात १,१६८.११ अंशांच्या मुसंडीसह ८१,७६५.७७ चा उच्चांक नोंदविला होता. तर निफ्टी निर्देशांक २४५.६५ अंशांनी वधारून २४,८७६.९५ वर बंद झाला. दिवसभरात त्याने ३९०.७ अंशांच्या कमाईने २५,०२२ चा स्तर गाठला होता. तथापि भावनिकदृष्ट्या महत्त्वाची २५ हजारांची पातळी निफ्टीला टिकवून ठेवता आली नाही.जागतिक पतमानांकन संस्था 'एस अँड पी'ने भाराताच्या सार्वभौम मानांकनांत तब्बल १८ वर्षांनंतर केलेली सुधारणा तसेच युक्रेन युद्धविरामाबाबत सुरू झालेली अमेरिका-रशिया चर्चा या घटकांनीही बाजारातील तेजीच्या भावनांना अतिरिक्त बळ मिळवून दिले. बाजारात खरेदीचा व्यापक जोर होता. परिणामी बीएसई स्मॉलकॅप निर्देशांक १.३९ टक्क्यांनी, तर मिडकॅप निर्देशांक १ टक्क्यांनी वधारला. सेन्सेक्समधील ३० पैकी २० कंपन्यांचे शेअर तेजीत होते.

त्या उलट सिगारेटला नवीन ४० टक्के कर टप्पात टाकले जाण्याच्या शक्यतेच्या परिणामी आयटीसी सर्वात जास्त तोट्यात होता, तो २.२६ टक्क्यांनी घसरला. बरोबरीने इटर्नल, टेक महिंद्र आणि लार्सन अँड टुब्रोतही घसरण झाली.



सेन्सेक्स : ८१,२७३.७५
▲ ६७६.०९ (+०.८४%)

निफ्टी : २४,८७६.९५
▲ २४५.६५ (+१.००%)

तेल $: ६६.२५ (▲ ०.६२%)

डॉलर ₹ : ८७.३६ (▼२३ पैसे)

टाटा ऑटोकॉम्पकडून स्लोव्हाकियातील 'आयएसी ग्रुप'चे अधिग्रहण

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

पुणे : टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेडची ब्रिटिश उपकंपनी आर्टिफिक्स इंटिरियर सिस्टिम्स लिमिटेडने (आर्टिफिक्स) स्लोव्हाकियातील आयएसी ग्रुप ताब्यात घेण्याची घोषणा केली आहे. या कंपनीतील शंभर टक्के भागभांडवल अधिग्रहित करण्यासाठी आर्टिफिक्सने सशर्त करार केला आहे.

या धोरणात्मक अधिग्रहणामुळे टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्सची क्षमता वाढणार होणार असून, ब्रिटन व युरोपमधील बाजारपेठेत कंपनीच्या विस्तारास मदत होणार आहे. या पावलामुळे टाटा ऑटोकॉम्पच्या महत्त्वाकांक्षी वाढीच्या योजनांना चालना मिळणार आहे. या अधिग्रहणाची पूर्तता नियामक मंजुरींसह काही सशर्त अटींवर अवलंबून आहे.

याबाबत टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेडचे उपाध्यक्ष अरविंद गोयल म्हणाले की, आयएसी ग्रुपचे अधिग्रहण हे टाटा ऑटोकॉम्पच्या जागतिक वाढीच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल. यापूर्वीच्या आर्टिफिक्सच्या अधिग्रहणानंतरचे हे पाऊल आमची युरोपमधील उपस्थिती अधिक मजबूत करेल. आयएसी ग्रुपची कार्यान्वयन क्षमता, कुशल मनुष्यबळ आणि धोरणात्मक भौगोलिक स्थान आमच्या इंटिरिअर सिस्टिम्स पुरविण्याच्या क्षमतेत वाढ करेल. या पावलामुळे जागतिक वाहन पुरवठा साखळीत आमचे स्थान आणखी बळकट होईल.

टाटा ऑटोकॉम्प सिस्टिम्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज कोल्हटकर म्हणाले की, आयएसी ग्रुपच्या क्षमतांचा वापर युरोपमधील आमच्या विस्तारासाठी होईल. दोनही कंपन्यांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया वेगाने पार पाडली जाईल. आमच्या वाहन निर्मिती क्षेत्रातील ग्राहकांना याद्वारे मूल्यवर्धित सेवा जलद गतीने देता येईल.

दररोज ९० हजार कोटींचे 'यूपीआय' व्यवहार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

देशभरात युनिफाईड पेमेंट इंटरफेस अर्थात यूपीआय व्यवहारांचे प्रमाण दिवसेदिवस वाढत असून, याच डिजिटल देयक परिसंस्थेचा अविभाज्य भाग असलेल्या 'यूपीआय'च्या दैनंदिन व्यवहारांनी ऑगस्टमध्ये ९० हजार कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला, अशी माहिती स्टेट बँकेच्या अहवालाने सोमवारी पुढे आणली.

वंदा जानेवारी महिन्यात दैनंदिन यूपीआय व्यवहार ७५,७४३ कोटी रुपयांवर पोहोचले होते. तेथून सरलेल्या जुलैमध्ये हे दैनंदिन व्यवहार वाढून ८०,९१९ कोटी रुपये गेले होते.

वाहनांच्या समभागांत भरधाव तेजी; कर-कपातीने किमती घसरण्याचे अंदाज

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: यंदाच्या दिवाळीत वाहन खरेदीचे मनाशी बाळगलेले स्वप्न हे घसरलेल्या किमतींमुळे अनेकांना पूर्ण करता येईल. निवडक कार आणि दुचाकींवरील वस्तू आणि सेवा कराचा (जीएसटी) दर सध्याच्या २८ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा केंद्र सरकारचा विचार असल्याने, या दिवाळीत वाहनांच्या किमती लक्षणीय कमी होण्याचे संकेत आहेत.

केंद्राच्या जीएसटी दरातील सुसूत्रीकरण प्रस्तावाचा सर्वाधिक लाभ हा वाहनांचा बाजारपेठेला होणे अपेक्षित असून, या परिणामी सोमवारी बाजारात वाहनांच्या समभागांना मोठी मागणी होती. मुख्यत्वे हिरो मोटोकॉर्पच्या शेअर्समध्ये जवळपास ९ टक्क्यांनी वाढ झाली आणि बाजार बंद होताना ती ६ टक्के वाढीसह, ४,९८३.८५ रुपयांवर स्थिरावला. बरोबरीने मारुती सुझुकी इंडिया ९ टक्के वाढीसह १४,०७५.३० रुपयांवर बंद झाला. अशोक लेलँड ८.१२ टक्के (२३१.८५ रुपये), ह्युंदाई मोटर इंडिया ८.४५ टक्के (२,४२७.२० रुपये), टीव्हीएस मोटर कंपनी ६.६० टक्के (३,२२०.२५ रुपये), बजाज ऑटो ४.५२ टक्के (८,५८०.२० रुपये), महिंद्र अँड महिंद्र ३.५४ टक्के (३,३८०.९५ रुपये), आयशर मोटर्स (२.४६ टक्के) आणि टाटा मोटर्स (१.७८ टक्के) अशी मुंबई शेअर बाजारात सर्वच वाहन निर्मात्या कंपन्यांमध्ये वाढ दिसून आली.

व्यापक सुधारणांमधून, इंजिन क्षमता आणि वाहनाच्या आकाराशी संबंधित वर्गीकरण अशा किचकट तरतुदी संपुष्टात येऊन, सध्या सर्वोच्च कर टप्प्यांत असलेल्या दरांची पुनर्रचना केली जाईल. ज्यामुळे शेवटी सामान्य माणसाला फायदा होईल आणि गेले वर्षभर मरगळलेल्या वाहन बाजारपेठेतही चैतन्य येईल. देशातील सर्वाधिक खपाची वाहन निर्मात्या मारुती सुझुकी इंडियाचे अध्यक्ष आरसी भार्गव यांनी जीएसटी कर तर्कसंगत करण्याच्या पावलांचे स्वागत केले आणि या सुधारणांचे निश्चितच चांगले परिणाम दिसून येतील, असा विश्वास व्यक्त केला.

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.
नोंदणीकृत कार्यालय: ५०१, सारथॉर्न ऑस्म, जखेला जिल्हा केंद्र, नवी दिल्ली - ११००२५
सीआयएन : यू६५९००डीएल२०पीएलसी३६६०२७

लिलाव सूचना

शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या खालील कर्जदारांना कळविण्यात येते की, बँकेकडून घेतलेले सोने कर्ज बँकेने जारी केलेल्या वैधानिक सूचनांसह विविध मागण्या आणि सूचना असूनही त्यांची स्मायोजित केलेले नाही. सर्व कर्जदारांना कळविण्यात येते की, बँकेकडे तारण म्हणून ठेवलेले सोन्याचे दागिने लिलाव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आणि त्यानुसार कर्ज घेतलेल्या सहयोग्य आहात **सकाळी ११.०० वाजता** लिलावाची वेळ निश्चित करण्यात आली आहे. कर्जदार, खातेदार आणि सर्वसाधारण जनता या लिलावात लिलावाच्या अटी आणि शर्तीनुसार सहभागी होऊ शकतात.

लिलावाची तारीख २८-०८-२०२५ @ सकाळी ११.०० वाजता आहे

अ.क्र.	शाखा	खाते क्र.	खाते धारकाचे नाव
1	पुणे हिलव्ह रोड	104242517205	प्रीतम डी. निकम

कोणतीही पुढील सूचना न देता लिलावाचुन कोणतेही खाते हटवण्याचा किंवा लिलाव रद्द करण्याचा अधिकार बँकेकडे राखीव आहे.

अधिकृत अधिकारी, शिवालिक स्मॉल फायनान्स बँक लि.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती.
विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती – ४४४६०३
दुरध्वनी क्र. ०७२१-२६६१६१० e-mail: dgmamravati@mahaurja.com

ई-निविदा सूचना

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती, जिल्हा अमरावती येथे ४०१ कि. वॅट क्षमतेचा पारेषण संलग्न सौर विद्युत प्रकल्प स्वबंधण, पुरवठा, आस्थापना, चाचणी, नन्न मापन प्रणाली तसेच दुरुस्थ निगरणी प्रणालीचे आस्थापनेसह ५ वर्षांच्या सर्वसमावेशक देखभाल व दुरुस्तीचे हमी हमीकरारासह (CMC) व सुटट्या भागांसह यशस्वीरित्या कार्यान्वित करणे या कामासाठी केंद्र शासनाच्या (न.उ.न.क. मंत्रालय)/शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणित असलेल्या सौर विद्युत संच / साधनांचे उत्पादक/टर्नकी इ.पी.सी. कंपनीज् व त्यांचे नोंदणीकृत वितरक यांच्याकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहे.

ई-निविदेच्या सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या ई-निविदांपैकी एक किंवा सर्व ई-निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचेकडे राखीव राहतील.

विभागीय महाव्यवस्थापक

motilal oswal Home Finance
मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : मोतीलाल ओस्वाल टॉवर, दीनदयालू उपाध्याय रोड, एस्टेट ऐश्वेलाल, एस्टेटी, मुंबई- ४०० ०२५.
CS: 8291889898 वेबसाइट : www.motilaloswalhf.com, ईमेल : hfquery@motilaloswal.com

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता /आयईएस)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ८ (१) अंतर्गत)

ज्याअर्थी, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (२००२ चा ५४) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ वाचत याचीच्या नियम ३(१२) अंतर्गत प्रदत्त केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत "मोतीलाल ओस्वाल होम फायनान्स लिमिटेड"चे (पूर्वीचे ओस्वाल होम फायनान्स कार्पोरेशन लि. म्हणून ओळखली जायची) प्राधिकृत अधिकारी म्हणून अशलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी उक्त सुरक्षेच्या स्वीकृतीच्या तारीखेपासून ६० दिवसांच्या आत चेवाली म्हणे कर्जदारांकडून अशलेल्या सुरक्षेच्या स्वरुपी परतफेड करण्याकरिता खालील बुकलेटमध्ये फर्जाविणारी चावाली म्हणे केलेले दिनांकित मागणी सूचना निर्गमित केली आहे.

बुकलेट फायनॅन्शियल कन्सल्ट अडवायर्स इशारे आहेत, याद्वारा खालील बुकलेटमध्ये नमूद केलेल्या सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी चावाली म्हणे केलेल्या तारीखेपासून सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ८ खाली याचीच्या ॲक्टच्या सेक्शन ९(३) अंतर्गत त्यांच्या प्रदत्त केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत चावाली जीएसटीच्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

अ. क्र.	नाव ऑफ बॉरोअर / कर्जदार / सह-कर्जदार / जामीनदार / मृत कर्जदार	मागणी सूचना तारीख व वसूल रक्कम	ताबा घेतल्याची तारीख	स्थावर मालमत्तेचे स्वरूप : मालमत्तेचे वर्णन/ प्रदत्त हित व सुरक्षेचे तपशील
1	LXNAS00316-170022511 / कर्जदार : गणेश बाबू कुंभकार सह-कर्जदार : भाग्यश्री उमाशी कुंभकार	२०.०५.२०२५, रु. १११४४६६/- करिता	१३.०८.२०२५	फ्लॅट नं. १३, शिवम मनवत, मेडीत अपार्टमेंट, मिरजगांव, साखरी, सर्वे नं. १२१/२, प्लॉट नं. ५९, ५५१, ६९, मिरजगांव, मनवत, भूमि-४१०३५५, महाराष्ट्र.

दिनांकः ०७.०८.२०२५ स्थळ : महाराष्ट्र

FEDBANK FINANCIAL SERVICES LTD.
नोंदणीकृत कार्यालय: फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड
सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (''ॲक्ट'') आणि सुरक्षा इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ (''नियम'') च्या तरतुदींगुसार मागणी सूचना.
निम्नस्वाक्षरीकार हे फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लि. चांचा अधिकृत अधिकारी आहेत यांनी कायद्याअंतर्गत आणि नियम ३ सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत मागणी सूचना जारी केली, ज्यात खातेदार कर्जदारांना सूचना मिळताच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत संबंधित सूचनेत नमूद केलेली रकमेस पत्त करण्याचे आवाहन केले. कर्जदार मागणी सूचनेची सेवा टाळत आहे/ करत आहे, असे सदाचित निम्नस्वाक्षरीकार यांचे मत आहे, म्हणून नियमानुसार सूचना चिकटवून आणि प्रकाशन करून सूचना चावावली जात आहे. मागणी सूचनेतील मजकूर खाली दिला आहे:

एलएएन/ कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ पत्ता

कर्ज खाते क्र. एफबीईएलएसएसव्हीएल०४८४६१२ आणि एफबीईएलएसएसव्हीएल०४९२७८१. १. महेश मेश्राम गिगडे (कर्जदार) २. मेश्राम मोतीराम गिगडे (सह-कर्जदार) ३. मंगल मेश्राम गिगडे (सह-कर्जदार) ते शाक्रज नं २, जाधव संकुल, गणेश कॉलनी, दत्तानगर, सातपूर लिंक रोड, अंबड नाशिक ४२२००१ ४. महेश मेश्राम गिगडे (कर्जदार) बॉईझर बायोमेड लिमिटेड, एफ-१९५, कनाकिया क्लिनिक, एलबीएस-सीटीएस रोड जंक्शन वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, रेला मजला कुर्ला पश्चिम मुंबई ४०००७०. ।. मागणी सूचना तारीख आणि रक्कम १३.०८.२०२५. रु. २१,४९,२८३/- (बावीस हजार एकोणपन्नास दोनशे त्र्याऐंशी फक्त) दि. १३.०८.२०२५ रोजीनुसार (एनपीसी तारीख १९.०८.२०२५) मालमत्तेचे वर्णन: ते शाक्रज नं. २ येथे जाधव संकुल येथील मेट्रो - प्लॉट क्रेडफळा "मोतेनाश अपार्टमेंट" नावाच्या इमारतीत ६७.२२ चौरस मीटर जागा आहे जी प्लॉट क्र. २२ वावर बांधली आहे, सर्वे क्र. १००/अ पैकी २२ मौजे चुंचाळे, जाधव संकुल, गणेश कॉलनी, दत्तानगर, सातपूर लिंक रोड, अंबड नाशिक ४२२००१ वाचे हे सर्व तुकडे आणि पार्सल. हाडे सीमाबद्ध: पूर्व: कॉलनी रोड, पश्चिम: गट क्र. १०३, उत्तर: आरएल क्र. ३, दक्षिण: आरएल क्र. १.

कर्जदारांना याद्वारे मागणी सूचनेचे पालन करणाया आणि नमूद केलेली मागणी रकमेस आणि सदर या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत लागू व्याज, अतिरिक्त व्याज, वाढ्रूप शुल्क, खर्च आणि देयक वसूल होईपर्यंतच्या खर्चासह परस्पराची सूचना देण्यात येत आहे. कर्जदारांने हे लक्षात ठेवावे की, एफबीईएफएसव्हीएल हे एक सुरक्षित धनको आहे आणि कर्जदारांने घेतलेली कर्ज सुविधा ही कर्जदारांने गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेवर/ मालमत्तेवर एक सुरक्षित कर्ज आहे. जर कर्जदारांने निर्धारित वेळेत हप्त्याची परतफेड केली नाही तर, एफबीईएफएसव्हीएल यांना निर्विवाद कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत सुरक्षित कर्जे आहे. जर कर्जदारांने निर्धारित वेळेत हप्त्याची सर्व अधिकार असतील, त्यामध्ये कायदा आणि त्याखालील नियमांनुसार विक्रीद्वारे किंवा उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायांचा वापर करून हस्तांतरित करणे आणि देयके मिळवणे समाविष्ट आहे परंतु इतकेच मर्यादित नाही. एफबीईएफएसव्हीएल यांना विक्री किंवा हस्तांतरणाचा अधिकार लागू करण्यापूर्वी सुरक्षित मालमत्तेना जोडण्याचा आणि/ किंवा सील करण्याचा अधिकार आहे. सुरक्षित मालमत्तेच्या संबंधित, जर तारण देयतेच्या मालमत्तेचे मूल्य एफबीईएफएसव्हीएल यांना देय असलेल्या देय रकमेसाठी अपूरे असेल तर, एफबीईएफएसव्हीएल यांना उर्वरित देय रकमेस पसूल करण्यासाठी स्वतंत्र कायदेसीर कार्यवाही सुरू करण्याचा अधिकार आहे. सदर या उपाय एफबीईएफएसव्हीएल यांना इतर कोणत्याही कायद्यांतर्गत उपलब्ध असलेल्या इतर सर्व उपायांपैकी अतिरिक्त आणि स्वतंत्र आहे. कर्जदारांने निर्धारित कायद्याच्या कलम १३(८) याकडे येथले जात आहे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्यासाठी आणि कायद्याच्या कलम १३(१३) कडे, त्याद्वारे कर्जदारांना सुरक्षित मालमत्तेचे विल्हेवाट लावण्यास किंवा त्यवहार करण्यास किंवा विक्री, भाडेपट्टा किंवा इतर मागींची (सामान्य व्यवसायाव्यतिरिक्त) कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचे हस्तांतरण करण्यास मनाई/ प्रतिबंधित केले जाते, एफबीईएफएसव्हीएल यांच्या पूर्व लेखी संमतीशिवाय आणि वरील नियमांचे पालन न करणे हा कायद्याच्या कलम २९ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकार त्य